अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २३ ऑक्टोबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २६ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# सोलापूर रेल्वेने साजरी केली दिवाळी दिवशी २१८ तरुणांच्या घरी दिवाळी

✔ सुराज्य/सोलापूर

**दिवाळी हा आनंदाचा सण. दीपोत्सव साजरा करून घरातील आणि मनातील अंधार दूर करण्याचा सण. धनत्रयोदशी हा याच सणातील एक दिवस. या दिवशी समुद्रमंथनातून प्रकट झालेली आरोग्याची देवता म्हणजे धन्वंतरी आणि धनाची देवता म्हणजे लक्ष्मी यांची पूजा केली जाते. दिवाळीच्या या दिवशी धनाच्या रूपाने लक्ष्मी चालत आली तर दिवाळीचा आनंद गगनात मावेनासा होतो. अगदी असाच आनंद सोलापूर रेल्वेमुळे एक नव्हे दोन नव्हे तब्बल २१८ तरुणांच्या घरी चालून आला आहे. कारण सोलापूर रेल्वेने धनत्रयोदशी दिनी तब्बल २१८ तरुणांना कायमस्वरूपी नोकरीची नियुक्ती पत्रे देऊन दिवाळी दिवशी वेगळी दिवाळी साजरी केली आहे.**



रोजगार मेळाव्यानिमित्त सोलापूर रेल्वे विभागातर्फे उमेदवारांना सोलापूर रेल्वे विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक शैलेंद्रसिंह परिहार यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. याप्रसंगी वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी जी. पी. भगत, वरिष्ठ विभागीय अभियंता चंद्रभूषण, अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. आनंद कांबळे आदी.

रोजगार मेळावा-२०२२ मोहिमे अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ७५ हजार युवकांना नियुक्ती पत्र प्रदान केले. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर रेल्वे विभागाने सिध्देश्वर रेल्वे अधिकारी क्लब येथे शनिवारी सकाळी साडेदहा वाजता सोलापूर रेल्वे विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक शैलेंद्रसिंह परिहार यांच्या हस्ते २१८ नवनियुक्त उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या रोजगार मेळाव्याचा शुभारंभ शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आला.

याप्रसंगी वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी जी. पी. भगत, वरिष्ठ विभागीय अभियंता चंद्रभूषण, अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. आनंद कांबळे, वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक प्रदीप हिरडे, विभागीय यांत्रिक अभियंता अमन कुमार, उपमुख्य अभियंता प्रदीप बनसोडे, सहायक वाणिज्य व्यवस्थापक कल्पना बनसोडे, सहायक कार्मिक अधिकारी शेख मस्तान आदी उपस्थित होते. यावेळी अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक शैलेंद्रसिंह परिहार, विभागीय सुरक्षा अधिकारी शिवाजी कदम यांनी रेल्वेच्या सुरक्षेविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्य कल्याण निरीक्षक सचिन बनसोडे, महावीर निमानी, प्रणव पावडे, अजय सावंत, अक्षय गर्दने, अरविंद खडाखडे, नागेश नवले, संजीव कुमार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभागीय कार्मिक अधिकारी रमेश अय्यर यांनी केले.

### ■ स्थायीस्वरूपी(पर्मनंट) नियुक्ती

रेल्वे रिक्रुटमेंट बोर्डाकडून ग्रुप सी आणि रेल्वे रिक्रुटमेंट सेलकडून ग्रुप डी पदाची भरतीसाठी २०१९ ते २०२२ दरम्यान वेळोवेळी परीक्षा व मुलाखती घेतल्या होत्या. या माध्यमातून सेंट्रल रेल्वेने सोलापूर विभागात २१८ तरुणांची निवड केली होती.यामध्ये ग्रुप सी आणि डी साठी ज्युनिअर इंजिनिअर, पर्मनंट वे, इलेक्ट्रिकल ज्युनिअर इंजिनिअर, सिग्नल मेंटेनर, विद्युत विभाग टेक्निशिअन, हेल्थ इन्स्पेक्टर, ट्रॅकमॅन आदी पदांची भरती केली आहे. ही नियुक्ती स्थायीस्वरूपी पध्दतीचे आहे.

### ■ ११ हजार उमेदवारांना मिळाली नोकरी

या मोहिमे अंतर्गत केंद्र सरकारच्या विविध विभागामध्ये एकूण १० लाख नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या आणि नागरिकांचे कल्याण सुनिश्चित करण्याच्या वचनबद्धतेची पूर्तता करण्याच्या उद्देशाने 'पंतप्रधान रोजगार मेळावा' सुरू केला. पंतप्रधान कार्यालयाने (पीएमओ) दिलेल्या निवेदनानुसार शनिवारी देशभरातील ७५ हजार उमेदवारांना नियुक्ती पत्रे दिली गेली. त्यात एकट्या रेल्वे विभागामध्ये ११ हजार उमेदवारांना नियुक्ती पत्रे देण्यात आली.

## पिकअपच्या धडकेत मुलाचा मृत्यू

### कुर्डूवाडीतील करमाळा चौकात अपघात

✔ सुराज्य/सोलापूर

दिवाळीचे साहित्य पाहून घरी निघाले असताना पिकअपने पाठीमागून येऊन दिलेल्या धडकेत पादचारी १७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला तर एक जण मुलगा गंभीर जखमी झाला. ही घटना २१ रोजी रात्री बार्शी-कुर्डुवाडीरोडवर करमाळा चौकात जुन्या बार्शीनाक्यासमोर घडली. याबाबत दीपक गांधले यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

विश्वा दीपक गांधले (वय १७ रा. माऊली नगर, कुर्डुवाडी, ता.माढा) असे त्या मुलाचे नाव असून आदित्य सादरे असे जखमीचे नाव आहे. शुक्रवारी विश्वा व त्याचा मित्र आदित्य दिवाळी साहित्य पाहून घरी जात होते. त्यावेळी बार्शीकडून येणाऱ्या पिक अपने (एम.एच. ४४ ८९९३) च्या चालक सुभाष कचरू गिरुटे (रा.गुंज, जि.जालना) याने दोघांना पाठीमागून जोराची धडक दिली. यामध्ये विश्वा मयत झाला. पिक अप चालक पळून जात असताना तेथील तरूणांनी त्याचा पाठलाग करुन पकडले व पोलिसांच्या स्वाधीन केले. कुर्डुवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

## महिला प्रवाशाचे तीन लाखांचे दागिने पळविले

✔ **पंढरपूर** : बस मध्ये प्रवेश करताना एका महिला प्रवासीच्या पर्समधून चोरट्याने ८७ ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले. ही चोरी काल शुक्रवारी दुपारच्या सुमारास पंढरपूर बस स्थानकात घडली. शिल्पा दत्तात्रय घुले (रा.श्रीपुर ता. माळशिरस) या काल दुपारी एक वाजेच्या सुमारास बस मध्ये प्रवेश करीत होत्या. त्यावेळी चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या पर्समधील ३ लाख ५ हजार रुपये किमतीचे दागिने पळविले. या चोरीची नोंद पंढरपूर शहर पोलिसात झाली आहे.

## टी-२० विश्वचषक आज भारत-पाक लढत

✔ **मेलबर्न** : भारत-पाकिस्तान सामना जसजसा जवळ येत चालला आहे, तशी मेलबर्न शहरातील वर्दळ वाढू लागली आहे. मेलबर्न येथे भारतीय संघ टी-२० विश्वचषकातील पहिला सामना पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे. रविवारी होणाऱ्या या सामन्याची खेळाडू आणि क्रिकेट चाहत्यांना प्रतीक्षा आहे.

मेलबर्नमध्ये शुक्रवारी रात्री मुसळधार पाऊस पडला, परंतु शनिवारी सूर्यप्रकाश होता. चांगली बातमी म्हणजे पुढील दोन दिवस




पावसाची शक्यताही कमी आहे. २३ ऑक्टोबर रोजी दिवसभर हवामान स्वच्छ राहणार आहे. आकाश ढगाळ राहील, पावसाची शक्यता कमी आहे. पहिल्या फेरीसाठी आणि सुपर-१२ साठी राखीव दिवस ठेवलेला नाही.

**भारतीय संघ** : रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), विराट कोहली, हार्दिक पंड्या, सूर्यकुमार यादव, दीपक हुडा, ऋषभ पंत, दिनेश कार्तिक (विकेटकीपर), रविचंद्रन अश्विन, युझवेंद्र चहल, अक्षर पटेल, भुवनेश्वर कुमार, हर्षल पटेल, अर्शदीप सिंग, मोहम्मद शमी.

**पाकिस्तान संघ** : बाबर आझम (कर्णधार), शादाब खान, आसिफ अली, हैदर अली, हरिस रौफ, इफ्तिखार अहमद, खुशदिल शाह, मोहम्मद हसनैन, मोहम्मद नवाज, मोहम्मद रिझवान, मोहम्मद वसीम जूनियर, नसीम शाह, शाहीन शाह आफ्रिदी, शान मसूद, फखर जाम.

## दवाखान्यातून डिस्चार्ज घेताच रूग्णाची आत्महत्या

✔ **सोलापूर** : आजारपणात रुग्णालयात उपचार घेतला.आणि डिस्चार्ज घेतल्यानंतर त्या ४५ वर्षीय इसमाने विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली. ही घटना जुना विडी घरकुल येथे शनिवारी उघडकीस आली.

इरफान चांदहुसेन शहापुरे (वय ४५ रा. लक्ष्मीचौक,जुना विडीघरकुल) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. त्याचा मृतदेह घरकुल परिसरातील म्हाडा विहिरीत आज सकाळी आढळून आला. इरफान शहापूरे हा आजारीअसल्याने त्याला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शुक्रवारी दुपारी डिस्चार्ज घेतल्यानंतर तो घरी आला.आणि सर्वांना भेटून तो बाहेर जाऊन येतो, असे सांगून घराबाहेर पडला होता.

त्यानंतर त्याचा मृतदेह आज सकाळी विहिरीत आढळून आला.तो मजुरी करीत होता. त्याच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे. आजारच कंटाळून त्याने आत्महत्या केली. अशी प्राथमिक नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. हवालदार चव्हाण तपास करीत आहेत.



दिवाळीसणानिमित्त सोलापूरकर खरेदीसाठी गर्दी करत आहेत. त्यामुळे बाजारपेठेत वाहतुकीची कोंडी होत आहे. शनिवारी दिवसभर टिळक चौकात अशीच परिस्थिती दिसून आली.

## पतीची वरवंटा आणि काठीच्या मारहाण; जखमी पत्नीचा मृत्यू

✔ **सोलापूर** : घरगुती भांडणातून वरवंटा आणि काठीने केलेल्या मारहाणीत जखमी झालेली रेश्मा संतोष पवार (वय २५ रा. रेणुकानगर, जुळे सोलापूर) ही विवाहिता शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शुक्रवारी सायंकाळी मरण पावली. रविवार (दि.१६ऑक्टोबर) रोजी सकाळच्या सुमारास तिचा पती संतोष पवार हा तिला भांडणातून मारहाण केली होती. तिला जखमी अवस्थेत युवराज (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान ती मरण पावली. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.




### सोरेगाव येथे तरुणाची आत्महत्या

✔ **सोलापूर** : सोरेगाव येथील डोणगाव रोडवर राहणाऱ्या हरीश हनुमंतराव नंदेशी (वय २९) या तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास त्याने बेडरूम मधील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतला होता. त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उच्चारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार मैत्री पुढील तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सत्तेचा फराळ आपणच संपवायचा!

कल्याण
279-83-355

## निळेशार आकाश पाहून सोलापूरकरांनी सोडला सुस्कारा

✔ सुराज्य/सोलापूर

गेल्या महिनाभरापासून सोलापूरसह जिल्हावासियांना जेरीस आणलेल्या पावसाने अखेर विश्रांती घेतली.पाण्याने भरून येणारे काळेकुट्ट ढग निघून गेले. निळेशार आकाश पाहून सोलापूरकरांनी अक्षरशः सुस्कारा सोडला. शनिवारी दिवसभर कोवळे ऊन पडले होते. सूर्याची किरणे दिवसभर झेलून सोलापूरकरांनी ऊब घेण्याचा मनसोक्त आनंद लुटला.

यंदाच्या पावसाळ्याने सळो की पळो करून सोडले. जिकडे तिकडे अतिवृष्टीच्याच बातम्या. अलिकडच्या काही वर्षांचा विचार करता असा पाऊस क्वचितच झाला. यंदाच्या पावसाळ्यातील एक दोन नक्षत्रे वगळता इतर नक्षत्रांच्या कालावधीत धुवाँधार पाऊस पडला. सोलापूरची वरदायिनी असलेले उजनी धरण ऑगस्ट महिन्यातच फुल्ल झाले.पावसाने दिलासा दिल्यानंतर खरीप



हंगामात सोयाबिन, तूर, उडीद या पिकांच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात झाल्या.मात्र सप्टेंबरनंतर पावसाने पाठ सोडली नाही. त्यात खरीप पिके भिजून वाया गेली. पुढे या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतात तळेच तयार झाले होते. गुरूवारी पावसाने चांगलाच दणका दिला. दिवसा ढग तर रात्रीचे झोडपणे...रात्रीच्या विजांच्या कडकडाटाने उडणारी रात्रीची झोप...हा पाऊस आठवला की, आताही छाती धस्स व्हायला लागते. सततच्या पावसामुळे गारठा निर्माण झाला होता. त्याने विविध आजार जडू लागले होते. त्यामुळे सोलापूरकर जेरीस आले होते. गुरूवारचा पाऊस पाहून अरे बाबा हा केव्हा हटेल, असा प्रश्न सर्वत्र विचारला जावू लागला होता. २० ऑक्टोबरनंतर मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला वेग येईल, असे हवामान खात्याकडून सांगण्यात आले होते. हा अंदाज अखेर खरा ठरला. शुक्रवारपासून ढग विरळ झाले आणि शनिवारी दिवसभर आकाश स्वच्छ होते. निळेशार आकाश पाहून कमालीचा आनंद वाटला.

**थंडीची चाहूल** : एक ऑक्टोबरपासून थंडीचा मोसम सुरू होतो परंतु सततच्या पावसामुळे थंडीच्या आगमनाची चाहूल लागलीच नाही.मात्र शुक्रवारपासून पाऊल गुल झाल्यानंतर मात्र,थंडीची चाहूल लागली आहे. शनिवारी सायंकाळी सूर्यास्तानंतर वातावरणात थंडी जाणवली.वाहनधारकांना काहीअंशी हुडहुडीही भरून आली.

**अतिवृष्टीचा असाही फायदा...** : ओला दुष्काळ परवडला पण कोरडा दुष्काळ नाही परवडत,असे म्हटले जाते.'कुछ पाने के लिए,कुछ खोना पडता है',अशी एक हिंदीत म्हण आहे. अतिवृष्टीने खरीप पिकांची हानी झाली असली तरी अतिवृष्टीमुळे विहिरी,तलाव,नाले व ओढे तुडूंब भरून वाहू लागले आहेत. नद्यांमधील पाणी दोन-तीन महिने पुरेल इतके आहे. त्यामुळे उजनी धरणावर ताण पडणार नाही. अन्यथा अवर्षण स्थितीत डिसेंबर महिन्यात उजनीमधून पाण्याची मागणी व्हायची. आता सोलापूरला जानेवारीपर्यंत काळजी नाही,असेही सांगण्यात आले. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मदत मिळण्याचा मार्गही मोकळा झाला. रानोरानी गवत उगवल्याने दुभत्या जनावरांना चारा उपलब्ध झाला.

**त्याचा भरवसा नाही...** : पावसाचा लहरीपणा पाहाता त्याच्यावर भरवसा ठेऊन चालणारच नाही.दिवाळीच्या वेळी बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ घोंगावणार असल्याची बातमी आहे.त्यावेळी कदाचित पाऊस डोकेवर काढत पुन्हा धुमाकूळ घालेल,अशी शक्यता वर्तवली गेलीय.अतिवृष्टीचा यंदाचा एक मजेशीर अनुभव सांगता येईल.अवर्षण काळात बेडूक पाण्यात ठेऊन,गाढवांची पूजा करून पावसाची आळवणी केली जायची पण यंदा हा पाऊस जाऊ दे म्हणून देवाकडे प्रार्थना होत होती.हा एक माणसाचा स्वभाव दोष.